World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

WWJMRD 2016; 2(11): 27-28
www.wwjmrd.com
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''मदर टेरेसा:-मानव सेवेचे प्रतीक''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
"We are working for the poorest of the poor, these people are hungry, unemployed, orphans, disabled, destitute, very sad. Because life has given them nothing. The service you are doing is leprosy, tuberculosis, cancer He is sick. Yes, leprosy has affected his body, not his heart, be very kind to him. Remember, these are our gods. You should also have a smile on your face, your behavior should be loving. To these poor people You are not needed. They will live, we need them. If you feed a rich person, he immediately invites you over for a meal and returns it. His gift is that poor people can't do it They keep their happiness. They do you no favors." (Mother Teresa)
People named Mother Teresa have every right to live with dignity and I will give them that right. They started begging for charity for the people of India. Many people helped her and some people treated her badly because She was a foreign woman.

**Keywords:** God, Christ, Mother Teresa, India, Hindus, Christians, Muslims, Kolkata, Orphans, Leprosy

**प्रस्तावना:**
''आपण गरीबातल्या गरीब लोकांसाठी काम करत आहोत,हे लोक उपाशी,बेकार,अनाथ.अपंग,निराधार आहेत,फार दु,खी आहेत.कारण आयुष्यान त्यांना काहीच दिलेलं नाही.तुम्ही ज्याची सेवा करताहात,त्यात महारोगी आहेत,क्षयरोगी आहेत,कंसरचे रुग्ण आहेत,महारोग त्यांच्या शरीराला झाला आहे,हृदयाला नव्हे,त्यांच्याशी अत्यंत प्रमाणे वागा.लक्षात ठेवा हेच आपले देव आहेत.तुमच्या चेहऱ्यावरही स्मित हास्य उमटलं पाहिजे,तुमच वर्तन प्रेमळच हव.या गरिबांना तुमची गरज नाहीये.त्याचं काय,आजवर जगले,तसचं लगेच पुढे जगतील,गरज आपल्याला आहे त्यांची.एखाद्या श्रीमंताला जेवू घातल,तर तो लगेच तुम्हाला जेवणाचं आमंत्रण देऊन त्याची परतफेड करतो.गरीब लोक तसं करू शकत नाहीट हेच त्याचं देण.आपला आनंद ते कायम राखतात.आपल्यावर उपकार करत नाही.*''(*मदर तेरेसा *)*
पेरेझ.डी.क्युलरन-यांनी मदर टेरेसांचा परिचय एकच वाक्यात करून दिला ''आय प्रेझेंट टू यु द मोस्ट पोवरफुल वूमन इन द वर्ल्ड''.तसेच_आशा कर्दळे म्हणतात ''आज अस्तीत्वही न उरलेल्या युगोस्लाविया या देशातून एक सामान्य मुलगी नन व्हायचं ठरवून भारतात आली,पूर्ण भारतीय झाली आणि जगाची मदरही झाली.पहिला राजीव गांधी सदभावना पुरस्कार भारत सरकारने मदर तेरेसांना दिला,त्या वेळीही मदरच्या अंतहीन सेवेचा आणि चालत येणाऱ्या सन्मानांचा प्रत्यय आलाच होता,पण इतकं होऊनही खऱ्या मदर तेरेसा भेटतात त्या वयाच्या ८२ व्या वर्षीही क्षीण शरीराला न जुमानता,व्याधीशी झगडत ''लेट अस डू समथिंग ब्युटीफुल फोर गोड''अस म्हणत रात्र रात्र काम आणि कामच करतात तेव्हा,या लहानखुऱ्या स्त्रीमधली अदम्य निष्ठा,अढळ विश्वास,तीच घडण जाणून घ्यायचं म्हणूनच हा खटाटोप''.
मदर तेरेसा यांचा जन्म १९१० मध्ये युगोस्लाव्हिया येथील स्कोप्जे या छोट्याशा गावात झाला,उदा:-ख्रिस्त बारा वर्षाचा असतांना यरुसलेमचा मंदिरात आढळला आणि आपल्या आई वडिलांना उत्तर दिले माझे घर देवाचे मंदिर आहे,मदर टेरेसा यांनी देखील बारा वर्षाच्या असतांना दिन दुबळ्या लोकांसाठी आपले संपूर्ण जीवन वाहून देण्यासाठी स्वतःला ख्रिस्तासाठी समर्पित करून दिले.बारा वर्षाच्या वयात काय कळते,पण हे बोलवणे देवाकडून होते.आज जगात दिन-दुबळ्याची,दलित पीडित आणि गरजू आणि गरिबांची सेवा करणाऱ्या असंख्य संस्था आणि लोकांच्या मदर टेरेसा प्रेरणास्रोत आहे,१९६२ ला मॅगसेसे पुरस्कार आणि १९७९ मध्ये शांतीचा नोबेल पुरस्काराने जेवढे समाधान झाले नाही तेवढे समाधान मदर टेरेसा यांना लोकांची सेवा करण्यात झाले,मदर तेरेसा यांना त्याच्या मरणोत्तर संत ही पदवी बहाल

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

करण्यात आली, कलकत्त्याला ५ सप्टेंबर १९९७ ला त्या ख्रिस्तात विलीन झाल्या.मदर तेरेसा यांचे अल्बानियन भाषेत गोक्झा असे नाव आहे,आणि त्याच्या अर्थ कळी असा होतो, म्हणुन आज *हेल्पिंग हँण्डस् मिशनने.त्याच कळीला पकडून समाजातील गरीब आणि वाळीत टाकलेल्या दिन दुबळ्या लोकांसाठी कार्यरत आहे.

मदर टेरेसा म्हणतात _"देवा माझ्या हातून अजूनही तुझ्यासाठी काहीतरी सुदंर घडू दे,जेव्हा मी उपाशी होते, तेव्हा तू मला खायला दिलंस जेव्हा मी तुषात होते,तेव्हा तू मला पाणी दिलंस जेव्हा मी बेघर होते तेव्हा तू माझ्यासाठी तुझी दार उघडलीस जेव्हा मी एकटा होते,तेव्हा तू मला तुझं प्रेम दिलंस या परक्या देशात तू मला निर्धास्त केलंस, मी लढत होते तेव्हा तू माझ्या जखमा पुसल्यास_ मदर टेरेसा यांनी भारताला आपली संपूर्ण कर्मभूमी मानली आणि म्हणून त्यांनी आपले सर्वस्व जीवन भारतातील गरीब,गरजू आणि अनाथ लोकांसाठी समर्पित केले,आपल्या प्रार्थनेत ते म्हणतात या भारत देशात माझे कोणी नाही फक्त तूच आहेस आणि तूच मला येथपर्यंत आणले आणि तूच मला तुझ्या महान कार्यासाठी गौरविले म्हणून तुझे मी मनापासून आभार मानते.या देशात राहत असतांना ख्रिस्ताने माझी संपूर्ण काळजी घेतली मला कोणत्याच गोष्टीची कमतरता भासली नाही कारण हे कार्य देवा तू माझ्याकडून करून घेतलंस.

कामिल पारखे म्हणतात "ख्रिस्ताच्या सेवेचे व्रत घेऊन युरोपतील एकोणीस वर्षाची एक युवती कोलकात्यात आली पुढे या शहराचेच नाव तिच्या नावाला चिकटले.' *मदर तेरेसा ऑफ कोलकाता'* या नावाने जगभर परिचित झालेल्या या जोगीणेने कोलकात्याला आणि भारतालाच आपली कर्मभूमी मानले संपूर्ण समाजाने नाकारलेल्या आणि सर्वात पददलित असलेल्या व्यक्तीची सेवा करून मदर टेरेसांनी समाजाच्या या सर्वाधिक उपेक्षित घटकांकडे जगाचे लक्ष वेधून घेतले.या पददलित व्यक्तींनाही जगण्याचाच नव्हे तर सन्मानाने जगण्याच्या हक्क आहे हे मदरने सर्वांना पटवून दिले."

मदर टेरेसा यांनी कोलकात्याला आपल्या जीवनाचे कण वेचले तरी त्याच्या परिणाम संपूर्ण भारतावर झाला धर्म वंश जातीयतेच्या नावावर उपेक्षित केलेला वर्ग हा फार मोठा होता.मदर टेरेसा म्हणतात अशा लोकांना सन्मानाने जगण्याचा संपूर्ण अधिकार आहे आणि तो अधिकार मी त्यांना मिळवून देणार अशा त्या म्हणत त्यांनी अनेक सामाजि संस्थांनाकडे भारतीय लोकांसाठी दान मागायला सुरुवात केली अनेकांनी त्यांना मदत केली तर काही लोकांनी त्यांना परकीय स्त्री आहे म्हणून त्यांना वाईट वागणूक दिली तरी त्यांनी हार मानली नाही आणि कष्टमय जीवन जागून अविरतपणे लोकांच्या कल्याणासाठी त्या अंतिम श्वासापर्यंत लढत राहिल्या.

नवीन चावला* मदर टेरेसाचे चरित्रकार म्हणतात मदर तेरेसा एकदा त्यांच्या विरोधकांना उत्तर देतांना म्हणाल्या *"भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी आल्या, त्यांनी अनेकांना तसा बाप्तिस्मा दिला, अशा असंख्य वार्ता त्या काळात उठत राहिल्या, पण तो सगळा तथ्यहीन होत्या. त्या एकदा अशाच टीकेला त्रासून म्हणाल्या, की होय, मी त्यांचे 'धर्मातर' घडवते. हिंदूंना अधिक चांगले हिंदू बना असे मी म्हणते, मुस्लिमांना मी अधिक चांगले मुस्लिम व्हा, असे सांगते आणि ख्रिश्चनांकडे अधिक चांगले ख्रिश्चन बना असा आग्रह धरते." मदर तेरेसा यांनी मिशनरी ऑफ चॅरीटी ची स्थापना केली.आणि गरीब आणि गरजवंतांची मदत करण्याच्या हेतुने त्यांनी पटना येथील होली फॅमिली हॉस्पीटल मधुन नर्सिंगचे शिक्षण पुर्ण केले.पुढे त्यांनी कलकत्ता येथे येऊन स्वतःला गरीब, असाहाय्य आणि वृध्द लोकांच्या सेवेत संपूर्णतः झोकुन दीलं. खुप ७ ऑक्टोबर १९५० ला मदर टेरेसा यांना समाज कार्यासाठी मिशनरी ऑफ चॅरिटी ही संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्यात आली. मदर टेरेसा यांच्या या उद्देश केवळ गरीब, गरजवंत,असाह्य आणि रूग्णं,तसेच लाचारांची सहाय्यता करणे आणि त्यांच्यात जगण्याची आस आणि नवीन उर्मी निर्माण करणे हाच होता. या व्यतिरीक्त करूणाहृदयी मदर टेरेसा यांनी 'निर्मल हृदय' आणि 'निर्मला शिशु भवन' नावाचे नवीन आश्रम सुरू केले. या आश्रमा मार्फत त्यांनी गरीब आणि आजारी लोकांवर उपचार केले.आणि अनाथ व बेघर मुलांची मदत करून त्यांनाआरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

मदर तेरेसा यांचावर भारतीय समाजातील सनातनी लोकांनी आरोप केले ही परदेशातील बाई भारतात येऊन हिंदूंना बाटवीत आहे.आणि ते हे सर्व पैशासाठी करीत आहे.पण त्यांनी कधीही अशा गोष्टींकडे लक्ष दिले नाही त्या म्हणतं *आमी भारतेर भारत आमार.मी भारताची आहे;भारत माझा आहे.आणि या वचनाप्रमाणे त्यांनी आपले संपूर्ण जीवन भारतासाठी देऊनही टाकले.

## संदर्भसूची:-


1. ख्रिस्ती मिशनरींचे योगदान,पारखे कामिल,सुगावा प्रकाशन,२००३,पुणे.
2. जगातील महान व्यक्ती,श.रा.देवळे,साकेत प्रकाशन,पुणे.